# प्रकरण पाचवे
# उपसंहार

१९६० नंतरच्या कालखंडात आपल्या उल्लेखनीय पत्रकारितेमुळे आणि ललित लेखनामुळे (कादंबरी, कथा, नाटक, चरित्र, समकालीन इतिहास) अरुण साधू यांना सिध्दहस्त पत्रकार व प्रथितयश कादंबरीकार म्हणून ओळखले जाते. अरुण साधू हे गेल्या चार दशकातील मराठीतील अग्रगण्य कादंबरीकारामध्ये आपल्या वेगळेपणामुळे उठून दिसतात. त्यांच्या एकूण अकरा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'मुंबई दिनांक', 'सिंहासन', 'तडजोड' या तीन राजकीय कादंबऱ्या आहेत. 'विप्लवा', 'स्फोट', ह्या विज्ञान कादंबऱ्या असून 'बहिष्कृत', 'त्रिशंकू' या कादंबऱ्या दलितांच्या जीवनजाणिवा व त्यांच्या समस्या प्रकट करणाऱ्या आहेत. 'शापित' ही कादंबरी दुष्काळाचे चित्रण करते तर 'शोधयात्रा' ही कादंबरी मानवी जीवनाचा शोध घेते. 'झिपऱ्या' ह्या कादंबरीत बुट पॉलीश करणाऱ्या मुलाची व्यथा व मुंबई नगरीचे चित्रण केले आहे. तर 'मुखवटा' ही कादंबरी एकत्र कुटुंबपद्धतीचे व व्यवस्थेचे संघटन करते अशा विविध आशयसूत्रांचे चित्रण करणाऱ्या अरुण साधू यांनी आपल्या कादंबऱ्यातून वैचारिकतेच्या पातळीवरून सामाजिक वास्तव मांडले आहे. 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्या लिहून त्यानी राजकीय कादंबरी हा प्रकार समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पत्रकाराच्या दृष्टीने त्यांनी समकालीन समाजातील सामाजिक व राजकीय घडामोडींचे, चढउतारांचे या कादंबऱ्यातून चित्रण केले आहे. त्यांच्या या कादंबऱ्या महत्त्वपूर्ण आहेत.

प्रस्तुत लघुप्रबंध अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या कादंबऱ्यांतील पत्रकारितेचे चित्रण हा एकूण पाच प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे. याचा आढावा प्रस्तुत 'उपसंहार' या प्रकरणात अभिप्रेत आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात 'साहित्यातील वैचारिकता: पत्रकारितेचे स्वरूप' या पहिल्या प्रकारणामध्ये साहित्यातील वैचारिकता व पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासले आहे. साहित्यातील वैचारिकता अभ्यासत असताना साहित्याची संकल्पना, साहित्य म्हणजे काय?, ललित व ललितेतर साहित्य या बाबी स्पष्ट केल्या आहेत. साहित्य ही संकल्पना फार मोठी आहे. साहित्यात शब्द व अर्थ एकत्र येत असतात. साहित्य म्हणजे मानवाच्या अनुभवांची अर्थपूर्ण भाषेतील अभिव्यक्ती असते. भाषा हे साहित्याचे द्रव्य आहे. साहित्याचे वर्गीकरण खूप व्यापक असून त्यामध्ये व्यक्तिनिर्मित साहित्यात ललित साहित्य येते. ललित साहित्य भावप्रेरीत असून प्रतिभा निर्मित असते. ललित साहित्यातून जीवनाचे दर्शन घडते. ललित साहित्यातून एखाद्या व्यक्तिमनाचा अनुभव व्यक्त होताना दिसतो. ललित साहित्य हे कथा, कादंबरी, काव्य या प्रकारातून व्यक्त होताना दिसते. ललितेतर साहित्य हे वस्तुनिष्ठ असून बुद्धिप्रेरित असते. ललितेतर साहित्य वाचकांच्या विचारांना आवाहन करताना दिसते. ललितेतर साहित्य हे वैचारिक पातळीवरून व्यक्त होताना दिसते. ललितेतर साहित्याला शास्त्रीय साहित्य असेही म्हटले जाते. ललितेतर साहित्यात वैचारिकता प्रकट होत असताना दिसते. साहित्यातील सर्वच कलाकृतीत वैचारिकता असते परंतु ती एक प्रकारची दिसून येत नाही. प्रत्येक कलाकृती स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण असताना दिसते. त्यामुळे प्रत्येक कलाकृतीतून व्यक्त होणारी वैचारिकता वेगवेगळी असताना दिसते.

पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासत असताना मराठी नियतकालिकाचा इतिहास पाहणे आवश्यक ठरते. त्यानुसार मराठी नियतकालिकांचे कार्य व स्वरूप अभ्यासले आहे. तसेच वृत्तपत्र, पत्रकार व पत्रकारिता अभ्यासली आहे. मराठी नियतकालिकांनी लोकशिक्षणाबरोबरच समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे व साहित्यात नवीन युग निर्माण करण्याचे कार्य केलेले दिसून येते. वृत्तपत्र म्हणजे बातमी देणारे पत्र असते. नेमके

काय घडले ते जाणण्यासाठी बातमीचा जन्म होतो. बातम्या देणे हे वृत्तपत्राचे महत्त्वाचे कार्य असते. भारतीय लोकशाही व्यवस्थेचा वृत्तपत्र हा चौथा स्तंभ मानला जातो. वृत्तपत्रात पत्रकार प्रमुख असतो. तो वृत्तपत्राला बातम्या पुरविणारा असतो. वृत्तपत्रावर लोकंचा प्रचंड विश्वास निर्माण होऊन वृत्तपत्रे ही भारतीय लोकशाहीत एक ताकद बनली आहेत असे दिसते. आजही वृत्तपत्रे आपली भूमिका पार पाडत असताना दिसत आहेत. अशा पद्धतीने साहित्यातील वैचारिकता व पत्रकारितेचे स्वरूप पहिल्या प्रकरणात अभ्यासले आहे.

'अरुण साधू यांची पत्रकारिता आणि त्यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व' या दुसऱ्या प्रकरणात अरुण साधू यांच्या पत्रकारिकतेची व वाङ्‌मयीन जीवनाची जडणघडण कशी होत गेली या विषयीची संपूर्ण ओळख तपशीलाने मांडली आहे. अरूण साधू हे मुळचे विदर्भातील असून त्यांच्यासारखा बहुविध, चौफेर लेखन करणारा लेखक दुर्मिळ आहे असे वाटते. त्यांचे बालपण, शिक्षण, मामाकडून मिळालेली वाचनाची प्रेरणा, पाश्चात्य अभिजात लेखकांच्या प्रेरणा, मिळालेली प्रेमळ पत्नी यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. त्यांची पत्रकारिता ही 'केसरी' या मराठी वृत्तपत्रापासून सुरू होऊन ती अजूनपर्यंत चालूच आहे. त्यांनी 'इंडियन एक्सप्रेस', 'टाइम्स ऑफ इंडिया', 'द स्टेट्‌समन' या सारख्या इंग्रजी वृत्तपत्रातूनही पत्रकारिता व्यवस्थितरित्या पार पाडली आहे असे दिसून येते. अरुण साधू यांनी मराठी व इंग्रजी दैनिकांत वेगवेगळ्या विषयावर स्तंभलेखन केल्याचे दिसून येते. त्यांची पत्रकारिता शोधक दृष्टीची आहे. अरुण साधू यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात उंचीच्या पदावर राहून आपली प्रतिमा स्वच्छ व आदरणीय राखल्याचे दिसून येते. अरुण साधू यांच्या 'माणूस' या वृत्तपत्रामधील 'आणि ड्रॅगन जागा झाला' आणि 'फिडेल, चे आणि क्रांती' या लेखमालेमुळे अरुण साधू लोकप्रिय झाले असल्याचे दिसून येते. वृत्तपत्रांच्या जगात आपल्या पत्रकारितेचा ठसा उमटविणारा लेखक आजच्या मराठी साहित्याचा अभिमानास्पद चेहरा असल्याचे दिसून येते.

अरुण साधू यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात राहूनही ललित लेखन केले आहे. ते मराठीतील ज्येष्ठ कादंबरीकार असून त्यांनी मराठी साहित्यास वेगळे वळण लावल्याचे दिसून येते. सामाजिक परिवर्तन व प्रबोधन घडावे म्हणून समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या जीवन जाणिवांचे चित्रण आपल्या कथा कादंबऱ्यातून केले आहे. अरूण साधू हे कल्पनाविश्वात रममाण न होता त्यांनी सामाजिक वास्तवावर लेखन केले आहे. अरूण साधू यांच्या कादंबऱ्या, कथा, नाटक व त्यांचे ललितेतर लेखन अभ्यासले आहे.

'मुंबई दिनांक' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण' या तिसऱ्या प्रकरणामध्ये अरूण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' मधील पत्रकारितेचे चित्रण अभ्यासण्यात आले आहे. १९६० नंतर मराठी कादंबरीत महानगरीय जीवन प्रवाह चित्रित होऊ लागला. त्यानुसार 'मुंबई दिनांक' या कादंबरीत महानगरीय जीवनाचे चित्रण आढळते. या कादंबरीतील आशयसूत्रांचा विचार केला आहे. यामध्ये मुंबई महानगरीचा परिचय करून दिला आहे. वेगवेगळ्या व्यक्तिचित्रणातून जनजीवनाचे वर्णन करून सर्वसामान्यांचे जीवन किती हलाखीचे, धावपळीचे व तेथील अर्थव्यवस्था कशी आहे हे आले आहे. महानगरातील राजकीय जीवन, त्यातील सत्ताकारण, स्पर्धा व राजकारणाचे रंग वेळोवेळी बदलले जातात याचे स्पष्ट दर्शन या कादंबरीत घडते. या कादंबरीत राजकीय व सामाजिक घडामोडींवर पत्रकारितेच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये अवैध धंदे, वृत्तपत्रे, राजकारण इत्यादी विषय पत्रकारितेच्या दृष्टिने पाहाण्यात आलेले आहेत. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा स्तंभ लोकशाहीत कशा पद्धतीने कार्य करीत आहे याचे विवेचन केले आहे. कादंबरीतील अय्यर ही पत्रकार व्यक्तिरेखा ही अभ्यासून त्याचे विशेष ध्यानात घेतले. इतर प्रातिनीधक व्यक्तिरेखाचाही विचार केला आहे.

'सिंहासन' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण' या चौथ्या प्रकरणामध्ये अरुण साधू यांचा 'सिंहासन' कादंबरी मधील पत्रकारितेच्या दृष्टीने केलेल्या चित्रणाचा शोध

घेतला आहे. या कादंबरीला पत्रकारितेचे अंग असून ती राजकीय घडामोडीमुळे लोकप्रिय झाल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील सत्तासंघर्ष, सत्तास्पर्धेच्या नव्या खेळ्या, मंत्रिमंडळात असणाऱ्या एकाच पक्षातील मंत्र्याचे परस्परांतील हेवेदावे, मुख्यमंत्री पदासाठीची मोर्चेबांधणी, फुटीचे राजकारण, स्वार्थी सत्ताकांक्षा इ. विविध राजकीय घडामोडी मांडण्यात आल्या आहेत. राजकीय सत्तास्पर्धा हे आशयसूत्र असल्यामुळे राजकीय व्यक्तींच्या खाजगी जीवनाबरोबरच सत्ता संघर्षातील त्यांचा डावपेच पत्रकाराच्या दृष्टिने मांडण्यात आला आहे. राजकीय व सामाजिक घडामोडीवर पत्रकारितेच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये राजकारण, वृत्तपत्रे, अवैध धंदे, खून, मारामाऱ्या इ. बाबी पत्रकारितेच्या दृष्टिने मांडण्यात आलेल्या आहेत. कादंबरीतील दिगू टिपणीस ही पत्रकार व्यक्तिरेखा अभ्यासून तिचे विशेष पाहिले. इतर प्रतिनिधीक व्यक्तीरेखांचाही विचार केला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या 'उपसंहार' या पाचव्या प्रकरणामध्ये पहिल्या प्रकरणापासून ते चौथ्या पर्यंतचा स्थूल आढावा घेतला आहे व अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**निष्कर्ष**

१. साहित्यातील वैचारिकतेचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, कादंबरी या साहित्य प्रकारातील वैचारिकता ही समाजदर्शन, बोध, तत्वचर्चा, प्रचार इ. रूपे घेऊन प्रकट होताना दिसते.

२. प्रत्येक साहित्य कृती ही स्वतंत्र असल्यामुळे प्रत्येक साहित्य कृतीतून व्यक्त होणारी वैचारिकता वेगवेगळी असल्याचे प्रकट होताना दिसते.

३. आधुनिक मराठी साहित्याच्या जडणघडणीत नियतकालिकांचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे दिसून येते.

४. वृत्तपत्र हा लोकशाही राज्यव्यवस्थेचा चौथा स्तंभ मानला जातो. वृत्तपत्र हे प्रत्येक व्यक्तीच्या दिनक्रमाचा एक भाग झाला असल्याचे दिसून येते.

५. पत्रकारिता हा एक महत्त्वपूर्ण व्यवसाय असल्याचे दिसून येते. त्यामध्ये विशेषत: शोधपत्रकारितेला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते.

६. ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार व पत्रकारिकतेचा प्राध्यापक असणाऱ्या अरूण साधू यांचे व्यक्तिमत्व चतुस्त्र, समाजदक्ष असल्याचे दिसून येते.

७. अरुण साधू यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपून मराठी व इंग्रजी पत्रकारितेत विशेष विशेष चमक दाखविल्याचे दिसून येते.

८. अरुण साधू यांनी साहित्याच्या कादंबरी, कथा, नाटक अशा विविध प्रकारातून लेखन करून ते समृद्ध केले असल्याचे दिसून येते. पत्रकारितेच्या क्षेत्रात राहूनही त्यांनी ललित लेखन केले आहे. हा त्यांचा विशेष दिसून येतो.

९. अरुण साधू यांच्या साहित्यावर पत्रकारितेचा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य विश्लेषणात्मक झाले आहे.

१०. 'मुंबई दिनांक' या कादंबरीमधून मुंबई महानगरीचे यथार्थ व वास्तव पातळीवरून चित्रण केल्याचे दिसते. कादंबरीला पत्रकारितेचे अंग असून एका नव्या तंत्राचा वापर केल्याचे दिसते.

११. 'सिंहासन' या कादंबरीमधून वास्तवतेच्या पातळीवरून राजकीय सत्तास्पर्धेचे चित्रण केल्याचे दिसून येते. या कादंबरीला पत्रकारितेचे अंग असून सिनेमॅटिक निवेदन पद्धतीचा वापर हा या कादंबरीचा विशेष सागता येईल.

१२. 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या दोन्ही कादंबऱ्यातून राजकीय जीवनातील सत्तास्पर्धा व सामाजिक घडामोडी मांडण्यात आल्या आहेत. या सत्तास्पर्धेवर व सामाजिक घडामोडीवर वृत्तपत्र हे माध्यम वेळोवेळी अंकुश ठेवताना दिसून येते.

# परिशिष्ट

## १. आधार ग्रंथ


१. साधू, अरुण : 'मुंबई दिनांक', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, जानेवारी २००७.

२. साधू, अरुण : 'सिंहासन', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, आठवी आवृत्ती, नोव्हेंबर २००६,


## २. संदर्भग्रंथ सूची

टीप : जेथे आवृत्तीचा उल्लेख नसेल तेथे प्रथमीवृत्ती समजावी.


१. कुलकर्णी, अ. वा. : 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, जूलै १९९७.

२. केतकर, ना. म. : 'केसकरी सूची', केसरी प्रकाशन, पुणे, १९८२.

३. गोखले, किरण : (संपा) 'पत्रकारिता-विद्या', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, फेब्रु, २००३.

४. पवार, सुधाकर : 'वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल', जयश्री प्रकाशन, नाशिक, १९६८.

५. राशिंगकर, सुधीर : 'वृत्तपत्रलेखन : तंत्र आणि मंत्र', उत्कर्ष प्रकाशन, औरंगाबाद, १९८४.

६. लेले, रा. के. : 'मराठी वृत्तपत्राचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४.

७. साधू, अरुण : 'अक्षांश-रेखांश', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९२.

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | साधू, अरुण | : | 'ड्रॅगन जागा झाल्यावर', राजहंस प्रकाशन, पुणे, लोक आवृत्ती, जाने. २००६. |
| ९. | सारडा, शंकर<br>वालावलकर, कमलेश | : | (संपा.) 'कालदर्शी', आशय पब्लिकेशनस्, सांगली, जाने. २००७. |

**३. नियतकालिक सूची**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खांडेकर, राजीव | : | 'अरुण उगवला!', लोकसत्ता, पुणे, शुक्रवार, दि. २९ डिसें. २००६. |
| २. | चेंबर्स एन्सायक्लोपिडीया | : | डिलेअर पब्लिकेशन कंपनी, सन. १९८५. |
| ३. | चौगुले, वि. शं. | : | 'अरुण साधू यांचे सदर लेखन', ललित, फेब्रु. २००७. |
| ४. | न्यू वेबस्टर्स डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज | : | डिलेअर पब्लिकेशन कंपनी, सन, १९८५. |
| ५. | माजगावकर, दिलीप | : | 'त्या दिवसातले साधू', लोकसत्ता, पुणे, रविवार, दि. ३ डिसें. २००६. |
| ६. | शोभणे, रवींद्र | : | 'अरुण साधू यांच्या राजकीय कादंबऱ्या', ललित, फेब्रु. २००७. |
| ७. | साक्रीकर, दिनकर. | : | (परीक्षण) 'फिडेल, चे आणि क्रांती', समाज प्रबोधन पत्रिका, मे, जून, १९७४. |
| ८. | साधू-बॅनर्जी | : | 'संवाद', लेख, महाराष्ट्र टाइम्स्, पुणे, रविवार, दि. २८ जाने. २००७. |


891.463
SAN
T15416